सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
RNI. NO. MAHBIL /25/A0192

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३४७ | बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,४८,८००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,३८,३००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१४,८००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३६०/-
भाव प्रती १० ग्राम




# श्री मंगळग्रह मंदिरात आजपासून भव्य महारुद्र पूजा

## श्रावण समाप्ती व संकल्पपूर्तीनिमित्त तीन दिवसीय विशेष धार्मिक सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात श्रावण मासाची समाप्ती व संकल्पपूर्तीनिमित्त बुधवार, दि. ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान भव्य महारुद्र पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले यांच्या शुभ हस्ते या विशेष धार्मिक सोहळ्यातील परम पवित्र अनुष्ठान होणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत दोन सत्रांत ही पूजा होईल. या भव्य महारुद्र पूजेचे पौरोहित्य प्रधान आचार्य वे. मू. श्री. केशव पुराणिक यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. या पूजेच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तीमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार असल्याने भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घेऊन आपला श्रावण सफल करत पुण्यफल मिळविण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळाने केले आहे. श्री मंगळग्रह मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकाची इच्छा लवकरात लवकर पूर्ण व्हावी, मंदिरातील ऊर्जा वाढावी व येणाऱ्या काळात वाढलेल्या हिंसाचारावर अंकुश यावा, अशी प्रार्थना करत श्री मंगळग्रह



मंदिरातील मुख्य स्वयंभू अतिजागृत मूर्तीवर ११ लघुरुद्र (१३३१ रुद्र आवर्तने) करून मंगळदेवांचा महाभिषेक हा सुमारे दोन दिवस चालणार आहे. तिसऱ्या दिवशी श्री मंगळदेव व मंदिरातील संपूर्ण परिवार देवतांचे हवन करून बलिदान व पूर्णाहुती करून हे कार्य सिद्धीस नेले जाणार आहे.

**महारुद्र पूजेची आध्यात्मिक फलश्रुती**

धार्मिक श्रद्धेनुसार महारुद्र पूजेच्या माध्यमातून मनःशांती, आरोग्य, सुख-समृद्धी, कुटुंबातील सौख्य आणि जीवनातील अडथळे दूर होण्यासाठी श्री मंगळदेवांची कृपा प्राप्त होते, अशी भाविकांमध्ये भावना आहे. संकटसमयी मानसिक बळ मिळावे, नकारात्मक विचार दूर व्हावेत आणि जीवनात सकारात्मकता व सात्त्विक विचारांची वृद्धी व्हावी, या हेतूने अनेक भाविक रुद्राभिषेक व महारुद्र पूजेचे अनुष्ठान करतात. श्री मंगळदेवांच्या कृपाशीर्वादाची फलश्रुती केवळ भौतिक इच्छांच्या पूर्ततेपुरती मर्यादित नसून आत्मशुद्धी, मनाची एकाग्रता, अहंकाराचा क्षय आणि ईश्वराशी असलेले नाते अधिक दृढ होणे हा तिचा व्यापक आध्यात्मिक अर्थ मानला जातो. त्यामुळे महारुद्र पूजा ही भक्ती, श्रद्धा आणि आत्मचिंतन यांचा सुंदर संगम ठरते. श्री मंगळदेव हे शिवपुत्र असल्याने ही महारुद्र पूजा अधिकच फलदायी ठरते.

### तीन दिवस भाविकासाठी विशेष सुवर्ण पर्वणी

महारुद्र पूजेदरम्यान तीन दिवसांत ११ लघुरुद्र अभिषेक पूजन तसेच १ लघुरुद्र हवन विधीवत होणार आहे. तसेच विविध धार्मिक विधी, मंत्रपठण व अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मंगळदेवभक्तांनी या आध्यात्मिक पर्वात सहभागी होऊन भगवान श्री मंगळदेवांचे दर्शन व पूजेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे. 'हर हर महादेव', 'मंगलदानी की जय हो', 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात तीन दिवस चालणाऱ्या या महारुद्र पूजेमुळे श्री मंगळग्रह मंदिर परिसर मंगलभक्तीच्या चैतन्याने भारावून जाणार असून, श्रद्धा आणि अध्यात्माचा हा मंगल धार्मिक सोहळा भाविकांसाठी विशेष सुवर्ण पर्वणी ठरणार आहे.






*अमळनेर : राज्यकर आयुक्त जळगाव सौ. स्मिताताई गांधी, 'जीएसटी' नाशिक विभागाच्या अतिरिक्त आयुक्त सौ. स्वातीताई काळे, राज्यकर उपायुक्त-अन्वेषण शाखा, जळगावचे श्री. सूर्यकांत कुमावत तसेच राज्यकर उपायुक्त-चौकशी शाखा, जळगावचे श्री. मुरलीधर बांडे यांनी मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी मंगळदेवांचे दर्शन घेतले. त्यांचा मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सत्कार करताना अॅड. सौ. नम्रताताई हिंदुजा. शेजारी अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, सी. ए. राजेशभाई शाह, सी. ए. अजय हिंदुजा, संस्थेचे मुख्य कार्यकारीअधिकारी अॅड. आर. जी. चव्हाण, यावेळी सर्व अधिकारी मंडळींनी श्री मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, क्रीडा आदी विविध उपक्रमांची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच प. पू. संतश्री सखाराम महाराज रोपवाटिकेसही भेट देऊन तेथील वृक्षारोपण, गांडूळ खत, गोवरी निर्मिती, गुलाब बाग, प्लास्टिंग क्रशिंग, जैविक द्रव खतप्रणाली तसेच निसर्ग बैठकीचाही फेरफटका मारला. सर्वांनी मंगळग्रह सेवा संस्थेच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.*

*(छायाचित्र : मयूर चौधरी)*






***अमळनेर : श्रावण मासानिमित्त मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी विधीवत श्री सत्यनारायण महापूजा तसेच कथाश्रवणानंतर मंगल आरती करताना विशेष मानकरी चंद्रकांत (मुन्ना) शर्मा व त्यांच्या धर्मपत्नी नगरसेविका सौ. कल्पनाताई शर्मा.***

### श्रावण मासानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात

## श्री सत्यनारायण महापूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात आज मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी श्री सत्यनारायण महापूजेचे भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात आयोजन करण्यात आले. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष महापूजा विधीवत परंपरेनुसार झाली.

या महापूजेचे विशेष मानकरी चंद्रकांत (मुन्ना) शर्मा व त्यांच्या धर्मपत्नी नगरसेविका सौ. कल्पनाताई शर्मा या दाम्पत्याच्या शुभ हस्ते भगवान विष्णूंच्या सत्यनारायण स्वरूपाची विधीवत महापूजा तसेच कथाश्रवण व आरती आदी धार्मिक विधी झाले. श्रावण महिना हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानला जातो. भगवान शिवजींच्या उपासनेसह या महिन्यात विविध धार्मिक अनुष्ठाने, व्रत-वैकल्ये, पूजा-अर्चा आणि श्री सत्यनारायण महापूजेला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

श्री सत्यनारायण भगवानांची पूजा ही सत्य, श्रद्धा, सदाचार आणि कुटुंबाच्या मंगलमय जीवनासाठी प्रार्थना करण्याची परम पवित्र परंपरा मानली जाते. मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी व यश जोशी यांनी पौरोहित्य केले. त्यांना उमेश पाठक यांनी सहकार्य केले. या महापूजेच्या निमित्ताने मंदिर परिसरात सकाळपासूनच आध्यात्मिक व प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. मंत्रोच्चार, धार्मिक विधी आणि भक्तीमय वातावरणामुळे मंदिर परिसर भाविकांनी गजबजला होता. महापूजेनंतर भाविकांना तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळी ९ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत श्री मंगळग्रह मंदिरात

पान २ वर



## संपादकीय

### वाढते तापमान हाच एक अणुबॉम्ब

नेपाळमध्ये झालेला जलप्रलयाचा हाहाःकार म्हणजे भविष्यकाळात येऊ घातलेल्या वेदनांचाच तो आक्रोश म्हणावा लागेल. नेपाळ असेल किंवा भारताचा उत्तर भाग असेल हा पर्वतमय तर आहेच. शिवाय अनेकदृष्टींनी तो नैसर्गिक आपत्तीच्याबाबतीत तो संवेदनशील ठरतो. वातावरणातील बदलांमुळे त्या- त्या ठिकाणच्या निसर्गामध्येही बरेच बदल घडून येत असतात. आणि ते कुठल्याही क्षणी कोणत्याही स्वरूपात आपत्तीजनकच ठरू शकतात. चीनकडून या सगळ्या सीमावर्ती भागामध्ये प्रचंड बांधकामे होत आहेत. स्वाभाविकपणे या बांधकामातून त्या भागातल्या पर्यावरणाचा समतोल बिघडतो आहे. नेपाळमध्ये झालेल्या जलप्रलयाला चीनमधील अवाजवी बांधकामेही जबाबदार ठरतात. आपल्या हद्दीमध्ये शेजारच्या देशाने काय करावे हा सर्वस्वी त्याचा अधिकार ठरतो. परंतु अशा पद्धतीने भविष्यकाळामध्ये संकट निर्माण होऊ शकतात हे लक्षात घेऊन भारतानेदेखील तयारी करणे गरजेचे ठरते. अलीकडेच हिमाचल प्रदेशातील जवळपास साडेतीन हजार मीटर उंचीवरच्या भागांचा आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. त्यामध्ये या सगळ्या परिसरात दोन हजार ७६ हिमनद्यांसारखी सरोवरे आढळून आली. २०१५ मध्ये अशा सरोवरांची संख्या केवळ ७१० होती. आता ती तब्बल ३० टक्क्यांनी वाढल्याचे पाहायला मिळाले. या हिमनद्यांसारख्या सरोवरांभोवती असलेले बंधारे भूस्खलन किंवा भूकंपासारख्या संकटांच्या वेळात फुटू शकतात. त्याचा हिमाचल प्रदेशातील लाहोलस्पिती आणि चंबा खोऱ्यांमध्ये प्रचंड प्रवाह घुसू शकतो.

यासंदर्भात योग्यवेळी जर काळजी घेतली गेली नाही तर ही सरोवरे म्हणजे काही क्षणातच प्रचंड नुकसान करणारे पाण्याचे बॉम्बच ठरतील अशा शब्दांत या धोक्याची गंभीरता आयआयटीच्या अभ्यासकांनी बोलून दाखविलेली आहे. खरेतर याच पद्धतीने अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती भारताच्या विविध भागामध्ये निर्माण होऊ शकतात. त्याचे स्वरूप वेगवेगळे असू शकेल. प्रामुख्याने निसर्गातलेच हे बदल आता एका मोठ्या नैसर्गिक आपत्तीचा सांगावा देणारे ठरू लागले आहेत. अतिवृष्टी, महापूर, दुष्काळ, अवकाळी पाऊस, भूकंप, यासारख्या संकटांना सातत्याने तोंड द्यावे लागण्याची भीतीदेखील व्यक्त होत आहे. या संकटांची मूळ कारणे वेगवेगळ्या स्वरूपाची आहेत. एकूणच पृथ्वीवर अनेक प्रकारच्या घडामोडी रोज घडत असतात. त्यामधून प्रामुख्याने पर्यावरणातल्या तापमानातच मोठी भर पडत राहते. त्यातून निर्माण होणारे हे दुष्परिणाम कुठे कशा स्वरूपात धोकादायक ठरतील हेही सांगता येणे कठीण होते आहे. हिमाचल प्रदेशातल्या या संभाव्य धोक्यांचा अंदाज जसा व्यक्त झालेला आहे त्याच पद्धतीने जागतिक हवामान संघटनेने आपल्या अलीकडच्या अहवालामध्ये २०२७ मध्ये हवामान बदलाच्या घटनांमधून नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त झालेली आहे. ज्यामध्ये अलनिनोचा प्रभाव वाढण्यापासून ते ठिकठिकाणच्या समुद्रांच्या पृष्ठभागावरच्या तापमानात वाढ होण्याची शक्यता वर्तवली गेली आहे. जगातील अनेक भागांत बदलत्या वातावरणाचे अनेक धोके निर्माण होऊ शकतील. त्यातला परस्परविरोध इतका विचित्र आहे, की उपाययोजना करतानासुद्धा अनेक देशांची कसोटीच पाहिली जाईल. जागतिक हवामान संघटनेचे असे म्हणणे आहे, की २०२६ च्या अखेरीपर्यंत तापमान हे उच्चपातळीवर पोहोचू शकते. ज्यामधून तीव्र उष्णता आणि अतिवृष्टी किंवा महापूर आणि अनेक ठिकाणी दुष्काळासारख्या आपत्ती निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्यावेळेला जागतिक आरोग्य संघटनेसारखी सर्वात मोठी संस्था अशा प्रकारच्या धोक्यांची शक्यता वर्तवते. त्याअर्थी येणारा काळ हा संकटांनाच आमंत्रण देणारा काळ आहे की काय असे वाटू लागते.

एक काळ असा होता की जागतिक स्तरावर होणारी मोठमोठी युद्ध त्यात वापरले जाणारे विध्वसंक शस्त्र किंवा अणुबॉम्ब हे जगाच्या विनाशाकरीता प्रमुख कारण मानले जात होते. परंतु निसर्गात सातत्याने घडून येणारे बदल त्यातही वाढते तापमान हाच एक मोठा अणुबॉम्ब ठरत असल्याचे म्हणावे लागते. कारण याच तापमानाचे वेगवेगळे परिणाम या चित्रविचित्र नैसर्गिक आपत्तींमध्ये पाहायला मिळतात. त्याची भयानकता काय असू शकते. किंवा काही क्षणात हजारो लोकांचे बळी घेण्यापासून ते त्या-त्या ठिकाणी होत्याचे नव्हते करण्याची भयानक परिस्थिती पाहायला मिळते. जी नेपाळच्या जलप्रलयातून स्पष्टपणे लक्षात येते आहे. या तापमानाचा अणुबॉम्ब कोणत्याच देशाला मोकळा सोडणारा नाही. प्रामुख्याने गेल्या पाच वर्षांत आपण कल्पनाही केली नसेल अशा प्रकारची संकटे प्रत्येक देशाला अनुभवावी लागली आहेत. त्यात दिसून येणारा परस्परविरोध किंवा टोकाच्या धोकादायक आपत्ती विशेषत्वाने लक्षात येतात. अगदी अमेरिका, रशिया, चीन जपान या देशांमध्ये कधीही इतक्या प्रचंड महापुराचे धोके निर्माण झाले नव्हते. जपानसारख्या देशात तर सुनामीसारखा प्रकार आता नित्याचा होऊ लागला आहे. मुंबईत पाणी तुंबले तर आपल्याला त्याचे किती त्रास सहन करावे लागतात हे प्रत्येकजण अनुभवतो. पण अमेरिकेसारख्या देशात न्यूयॉर्कसारख्या शहरात अतिवृष्टीतून प्रचंड पाण्याचे लोट निर्माण होण्याचा प्रकार घडून आला. आणि त्याच अमेरिकेत आरामदायी जीवनाची सवय असलेल्या लोकांनी निसर्गाच्या सान्निध्यात आलिशान असे बंगले बांधले होते. परंतु त्या जंगलांमध्ये प्रचंड वणवा निर्माण होणे आणि त्यात शेकडो लोकांचे बळी जाणे हा प्रकार अमेरिकेनेसुद्धा पहिल्यांदा अनुभवला. अनेक आधुनिक साधनांनी किंवा संशोधनातून विकसित देशांचे गोडवे गायिले जात होते. परंतु अचानक वाढत असलेल्या नैसर्गिक आपत्तींनीदेखील त्यांच्या या व्यवस्थांचाही बोजवारा उडवला आहे. नेपाळमधला जलप्रलय, हिमाचलमध्ये हिमसरोवरांमध्ये झालेले बदल आणि जागतिक हवामान संघटनेने २०२७ साठी दिलेला इशारा या सर्वांचा एकमेकांशी खूप घनिष्ट संबंध येतो. अन्य कुठल्या विध्वंसक शस्त्र किंवा अस्त्रांपेक्षा प्रचंड वेगाने वाढणारे तापमान अधिकाधिक विध्वसंक ठरणारे आहे.

### शेतातील मोटारीची वायर, शेती साहित्याची चोरी

**अमळनेर :** तालुक्यातील सारबेटे खुर्द शिवारात चोरट्यांनी मध्यरात्री शेतात प्रवेश करून पाण्याच्या मोटारीची वायर तसेच विविध शेती साहित्य लंपास केले. या घटनेत शेतकऱ्याचे वीस हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

सारबेटे खुर्द येथील शेतकरी विजय लुकडू पाटील यांचे सारबेटे शिवारात शेत आहे. सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी रात्री २ ते पहाटे ५ वाजेदरम्यान चोरट्यांनी शेतात प्रवेश केला. शेतातील पाण्याच्या मोटारीची वायर तसेच अन्य शेती साहित्य चोरून नेले. सकाळी शेतात गेल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात आला. पिकांना पाणी देण्यासाठी आवश्यक असलेली मोटारीची वायर व अन्य साहित्य चोरीला गेल्याने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले आहे. ग्रामीण भागातील शेतांमध्ये रात्रीच्या वेळी चोरीच्या घटना वाढत असल्याने शेतमाल व शेती साहित्याच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याबाबत अमळनेर पोलिस ठाण्यात एन. सी. दाखल करण्यात आली असून, हवालदार देशमाने पुढील तपास करीत आहेत.

# मतदारयादीचा 'एसआयआर' धडकला!

## अमळनेर विधानसभा मतदारसंघातून ३९ हजार ५९५ मतदार वगळले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील विधानसभा मतदार पुनरीक्षण संघातून ३९ हजार ५९५ मतदार वगळण्यात आले आहेत. तर ३३ हजार ९६६ मतदार संशयित आहेत, अशा मतदारांना नोटिसा देऊन त्यांना अपीलसाठी बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. अमळनेर तालुक्यात उपविभागीय अधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी मयूर भंगाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम राबविण्यात आला. १५ अतिरिक्त सहाय्यक नोंदणी अधिकारी यांच्या नेतृत्वात ३५ पर्यवेक्षक, ३२५ बीएलओ यांनी घरोघरी जाऊन प्रत्येक मतदारांची माहिती गोळा करीत त्यांचे पुरावे तपासले. यात अनेक मतदार मृत, डुप्लिकेट, स्थलांतरित झालेले व आढळून न आलेले मतदार असे ३९ हजार ५९५ मतदार आढळले. विधानसभा मतदारसंघात तीन लाख दोन हजार ९४ मतदार होते. त्यातून ३९ हजार ५९५ वगळले आहेत.

**३३ हजार ९६६ मतदारांची सुनावणी घेतली जाणार**

संशयित ३३ हजार ९६६ मतदारांची सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यांनतर दि. ४ नोव्हेंबर २०२६ ला मतदारयादी सादर होईल. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० च्या कलम २४ अंतर्गत अपिलाची तरतूद असून मतदार नोंदणी अधिकारी यांच्या निर्णयाविरुद्ध कलम २४ (अ) अन्वये जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे अपील करता येईल. तसेच पहिल्या अपिलीय प्राधिकरणाच्या निर्णयाविरुद्ध कलम २४ (ब) नुसार मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम २७ अन्वये विहित पद्धतीने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे दुसरे अपील करता येईल.

**नागरिकांसाठी टोल फ्री क्रमांक**

नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी १९५० हा टोल क्रमांक मोफत कार्यान्वित आहे. हा क्रमांक सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कार्यरत राहील. तसेच ईसीनेट ॲप मधील बुक कॉल विथ बी एल सुविधेचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी १ ऑक्टोबर २०२६ ही वयाचे १८ वर्षे अहर्ता दिनांक असून त्यांनी नमुना ६ भरून मतदार यादीत आपले नाव नोंदवावे.

> ❝ ***हरकती नोंदविणाऱ्या मतदारांची सुनावणी घेऊन त्यांचे पुरावे, माहिती तपासून दि. ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत त्यावर निर्णय घेऊन मतदार वाढविणे अथवा कमी करणे अशी प्रक्रिया केली जाईल.***
> *– **मयूर भंगाळे,** मतदार नोंदणी अधिकारी, अमळनेर.*



**अमळनेर : तालुक्यात पावसाचे असमान वितरण झाल्याने खरीप पिके संकटात आली आहेत. मका, मूग, बाजरी, ज्वारी, सोयाबीन व कपाशीच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी आर्थिक मदत द्यावी, या मागणीचे निवेदन महसूल अधिकाऱ्यांमार्फत प्रांताधिकाऱ्यांना देताना काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, सौ. सुलोचनाताई वाघ, मनोज पाटील, प्रा. श्याम पवार, रामकृष्ण पाटील, शरद पाटील, डॉ. प्रकाश सोनवणे, बन्सीलाल भागवत शालिग्राम पाटील, राजेंद्र चौधरी, हर्षल जाधव, धोंडू महाजन, भगवान संदानशीव, सुभाष शिंदे आदी.**

# पावसाची आकडेवारी नव्हे, पिकांची स्थिती पाहा

## शेतकऱ्यांना हेक्टरी मदत द्या : तालुका काँग्रेसची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात पावसाचे असमान वितरण झाल्याने खरीप पिके संकटात आली आहेत. मका, मूग, बाजरी, ज्वारी, सोयाबीन व कपाशीच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी अमळनेर तालुका काँग्रेस कमिटीतर्फे करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन प्रांताधिकाऱ्यांना नुकतेच देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत तालुक्यात सरासरी ४७४.३० मि.मी. पाऊस झाला असला, तरी पावसाचे वितरण असमान आहे. अनेक बंधारे व तलाव कोरडे असून पिकांना पावसाचा अपेक्षित फायदा झालेला नाही. कपाशीवर बोंडअळी व लाल्या रोगाचा प्रादुर्भावही दिसून येत आहे. पावसाची आकडेवारी न पाहता अधिकारी शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि उत्पादनातील घट लक्षात घेऊन मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी यांनी केली आहे.

निवेदन देतेवेळी सौ. सुलोचनाताई वाघ, मनोज पाटील, प्रा. श्याम पवार, रामकृष्ण पाटील, शरद पाटील, डॉ. प्रकाश सोनवणे, बन्सीलाल भागवत शालिग्राम पाटील, राजेंद्र चौधरी, हर्षल जाधव, धोंडू महाजन, भगवान संदानशीव, सुभाष शिंदे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतीशी असलेले नाते मृत्यूनंतरही कायम

## भद्रा प्रतीक उद्योग समूहाच्या प्रवर्तक संचालिका प्रमिलाताईंच्या स्मृतींना पर्यावरणपूरक मानवंदना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री भद्रा प्रतीक उद्योग समूहाच्या प्रवर्तक संचालिका स्व. सौ. प्रमिलाताई सुरेश साळी यांचे गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने साळी परिवारासह नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांमध्ये शोककळा पसरली. मात्र, त्यांच्या अस्थी विसर्जन व रक्षा विसर्जनाचा पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळा आणि पर्यावरणपूरक निर्णय घेत त्यांच्या स्मृतींना अनोखी मानवंदना देण्यात आली.



स्व. प्रमिलाताईंना शेती आणि निसर्गाची विशेष आवड होती. लहानपणापासूनच त्यांनी आपल्या वडिलांच्या शेतात काबाडकष्ट करत शेतीकामे केली. उन्हातान्हात मेहनत घेत त्यांनी शेती फुलवली, हिरवाई जपली आणि निसर्गाशी असलेले आपले नाते आयुष्यभर टिकवून ठेवले. शेतीत काम करण्याची त्यांना विशेष आवड असल्याने त्यांच्या या जिव्हाळ्याच्या नात्याची आठवण कायमस्वरूपी जपण्याचा परिवाराने निर्णय घेतला. त्यामुळे ज्या शेताशी प्रमिलाताईंच्या आठवणी आणि आयुष्यभराचे नाते जोडलेले होते त्याच शेतात त्यांच्या अस्थींचे रक्षा विसर्जन करण्यात आले. पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडलेल्या या भावनिक विधीतून 'ज्या मातीत आयुष्यभर कष्ट केले, त्याच मातीत अंतिम स्मृती जपाव्यात' असा हृदयस्पर्शी संदेश देण्यात आला. प्रमिलाताईंचे निसर्गप्रेम, शेतीवरील माया आणि मातीशी असलेले नाते या अनोख्या निर्णयामुळे त्यांच्या स्मृतींसोबत कायमचे जोडले गेले.

# बँकेत ग्राहकाचे पिशवी कापून ३१ हजार लंपास!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बँक ऑफ बडोदा, न्यू प्लॉट जैन मंदिरासमोरील शाखेत भरदिवसा पाकीटमारने पिशवी कापून ३१ हजार २०० रुपये लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी काशिनाथ उत्तम महाजन (वय ६३, धंदा- मजुरी, रा. बोरसे गल्ली, शाळा नं. १२ जवळ, अमळनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० ते २ वाजेच्या सुमारास ते व त्यांची पत्नी रत्नाबाई महाजन हे ३१ हजार २०० रुपये फिक्स डिपॉझिट भरण्यासाठी बँक ऑफ बडोदामध्ये गेले होते. स्लीप भरताना त्यांच्या हातात असलेली नायलॉन रंगबिरंगी पट्टे असलेली पिशवी चोरट्याने कापली आणि त्यातील रोख रक्कम लंपास केली. घटनास्थळी व आजूबाजूला शोध घेतला असता पैसे मिळून आले नाहीत. त्यामुळे फिर्याद नोंदविण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या आदेशान्वये पोलीस शिपाई विनोद संदानशीव तपास करीत आहेत.



**अमळनेर : येथील भजन सेवावृत्ती संमेलनतर्फे रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी मुक्ताईनगरात भजनसंध्या कार्यक्रम झाला. यावेळी झालेल्या स्पर्धेत नारायणी मराठा समाज महिला भजनी मंडळाच्या सौ. पूजाताई पाटील यांच्यासह ग्रुपने प्रथम, तर सुवर्णकला सांस्कृतिक मंडळाच्या सौ. करुणाताई सोनार यांच्यासह ग्रुपने द्वितीय क्रमांक मिळविला. मराठा समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुलोचनाताई पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक स्वीकारताना दोन्ही ग्रुपच्या सदस्या.**

### श्री सत्यनारायण महापूजा


**पान १ वरून :** आलेल्या भाविकांनी श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतले तसेच तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीष कुलकर्णी, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त अनिल अहिरराव, डी. ए. सोनवणे, संस्थेचे सीईओ ॲड. आर. जी. चव्हाण, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, व्ही. व्ही. कुलकर्णी, तसेच भाविक व मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाताळेश्वर मंदिरात ४१ फुटी त्रिशूलाची स्थापना

## 'हर हर महादेव'चा जयघोष; असंख्य भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बोरी नदीच्या मध्यभागी वसलेल्या सुमारे २०० वर्षे जुने पाताळेश्वर महादेव मंदिरात ४१ फुटी भव्य त्रिशूलाची मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात स्थापना करण्यात आली. यानिमित्त फरची रोडवरील मारुती मंदिरापासून पाताळेश्वर महादेव मंदिरापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली. डीजेच्या तालावर आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषात भाविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. शोभायात्रेमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



**अमळनेर : येथील बोरी नदीच्या मध्यभागी वसलेल्या सुमारे २०० वर्षे जुने पाताळेश्वर महादेव मंदिरात करण्यात आलेली ४१ फुटी भव्य त्रिशूलाची स्थापना.**

हा भव्य त्रिशूल ज्ञानेश्वर रामा लोहार(रा. पैलाड, अमळनेर) यांच्या वतीने सेवाभावी भावनेतून पाताळेश्वर महादेव मंदिरास अर्पण करण्यात आला. त्रिशूल स्थापनेच्या कार्यक्रमास असंख्य भाविक भक्तांची उपस्थिती लाभली. पैलाड, वाडी चौक, भोईवाडा तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा आनंद घेतला. कार्यक्रमानंतर भाविकांसाठी प्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली. या धार्मिक उपक्रमासाठी प्रसाद माऊली ग्रुप आणि शिवशक्ती साऊंड यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच सुभाषमामा पाटील, गुलाबबापू गुरव, संदीप शिंगणे, सोनू भोई, हर्षल भोई, रमेश भोई, सुनील कोळी, दिलीप कोळी आणि विजयभाऊ पाटील यांचे मंदिरासाठी वेळोवेळी लाइटिंग व अन्य स्वरूपात सहकार्य लाभत असल्याचे सांगण्यात आले. ४१ फुटी त्रिशूलाच्या स्थापनेने पाताळेश्वर मंदिराच्या धार्मिक वैभवात आणखी भर पडली असून, भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करा

## धनगर समाजाची मागणी; तहसीलदार डॉ. ढेकळे यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धनगर समाजाच्या आरक्षणाची शासनाने पूर्ण ताकदीने अंमलबजावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सर्व कायदेशीर व घटनात्मक बाबी स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र दाखल करावे. तसेच अनुभवी वकिलाची नियुक्ती करावी, या मागणीसाठी येथील सकल धनगर समाजातर्फे उत्तर महाराष्ट्र ऑल इंडिया धनगर समाज महासंघ, दिल्लीचे अध्यक्ष बन्सीलाल भागवत यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार डॉ. उमाताई ढेकळे यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की धनगर समाजाच्या आरक्षणाची शासनाने पूर्ण ताकदीने अंमलबजावणी करावी, त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सर्व कायदेशीर व घटनात्मक बाबी स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र दाखल करावे तसेच अनुभवी वकिलाची नियुक्ती करावी. यासोबतच संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करावा, देवस्थानच्या विश्वस्त मंडळात २१ सदस्य असावेत आणि अध्यक्षपद धनगर समाजातील व्यक्तीला दिले जावे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मिसिंग लिंकला स्वातंत्र्यवीर शिंग्रोबा यांचे नाव द्यावे, तसेच मुंबईतील चर्चगेट रेल्वेस्थानकाचे नामकरण पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने करावे.

यावेळी नितीन निळे, मच्छिंद्र लांडगे, एस. सी. तेले, हरचंद लांडगे, रमेश शिरसाठ, दिलीप खांडेकर, चंद्रकांत कंखरे, प्रदीप कंखरे, चेतन देवरे, विलास कंखरे, शरद धनगर, अनिल धनगर, सौरव भागवत, भाऊलाल पाटील, निखिल धनगर, अर्जुन भागवत, संदीप पाटील, देविदास पाटील, संदीप धनगर आदी उपस्थित होते.



**अमळनेर : धनगर समाजाच्या आरक्षणाची शासनाने पूर्ण ताकदीने अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी येथील सकल धनगर समाजातर्फे उत्तर महाराष्ट्र ऑल इंडिया धनगर समाज महासंघ, दिल्लीचे अध्यक्ष बन्सीलाल भागवत यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार डॉ. उमाताई ढेकळे यांना निवेदन देताना नतीन निळे, मच्छिंद्र लांडगे, एस. सी. तेले, हरचंद लांडगे, रमेश शिरसाठ, दिलीप खांडेकर, चंद्रकांत कंखरे, प्रदीप कंखरे, चेतन देवरे, विलास कंखरे, शरद धनगर, अनिल धनगर, सौरव भागवत, भाऊलाल पाटील, निखिल धनगर, अर्जुन भागवत, संदीप पाटील, देविदास पाटील, संदीप धनगर आदी.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# लेकीचे नाव 'इंडिया' का ठेवले?

## जॉंटी ऱ्होड्सने सांगितला पंतप्रधान नरेंद्र मोदींसंबंधित २०१४ मधील किस्सा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू आणि जगप्रसिद्ध क्षेत्ररक्षक जॉंटी ऱ्होड्स याचे भारताशी असलेले नाते काही वेगळेच आहे. क्रिकेटमध्ये जगातील बेस्ट फिल्डर्सच्या यादीत ऱ्होड्स पहिल्या स्थानी आहे. मूळचा दक्षिण आफ्रिकेचा असला तरी त्याचे भारतावर विशेष प्रेम आहे आणि हेच प्रेम व्यक्त करण्यासाठी ऱ्होड्सने आपल्या लेकीचे नाव इंडिया असे ठेवले आहे. ऱ्होड्सने आपल्या मुलीचे नाव 'इंडिया' का ठेवले, यामागची खास गोष्ट सांगितली आहे. यादरम्यान त्याने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही उल्लेख केला आहे. त्याच्या एका वक्तव्यामुळे पुन्हा एकदा भारताशी असलेल्या त्याच्या खास कनेक्शनची चर्चा सुरू झाली आहे.

जॉंटी ऱ्होड्सचे भारताशी असलेले नाते केवळ क्रिकेटपुरते मर्यादित राहिलेले नाही. भारतात मुलीचा जन्म झाल्यापासून तिचे नाव 'इंडिया' ठेवण्यापर्यंत ऱ्होड्स कुटुंबाचा या देशाशी एक खास जिव्हाळा निर्माण झाला आहे. त्यामुळे भारताबद्दल बोलताना ऱ्होड्सच्या या खास आठवणी आणि भावना चाहत्यांचे लक्ष वेधून घेतात. सध्या एका मुलाखतीत जॉन्टी ऱ्होड्सने पुन्हा एकदा लेकीचे नाव इंडिया ठेवण्याबद्दल वक्तव्य केले आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये ऱ्होड्सने सांगितले, की माझ्या मुलीचे नाव इंडिया आहे. तिचा जन्म २०१५ मध्ये येथेच भारतात झाला. हा कोणताही राजकीय मुद्दा नाही. पण २०१४ पासून मोदीजी 'मेक इन इंडिया'बद्दल बोलत होते, बरोबर ना? त्यामुळे माझी पत्नी आणि मी या विचाराशी खूप जोडले गेलो. आम्हाला २०१५ मध्ये लेक 'इंडिया' आणि २०१७ मध्ये मुलगा नॅथन झाला. त्यामुळे मोदीजींनी २०१४ मध्ये 'मेक इन इंडिया'बद्दल बोलायला सुरूवात केल्यापासून आम्हीही 'इंडिया' घडवत आहोत, असेच म्हणता येईल. त्यामुळे भारताबद्दल आमच्या दोघांचेही तितकेच प्रेम आहे.

जॉन्टी ऱ्होड्स २०१५ मध्ये आयपीएलमधील मुंबई इंडियन्स संघाचा फिल्डिंग कोच म्हणून रुजू झाला होता. तो २००९ पासून मुंबई इंडियन्ससोबत या पदावर काम करत होता. याचदरम्यान एप्रिल २०१५ मध्ये जॉन्टी ऱ्होड्सच्या मुलीचा जन्म झाला. जिचे पूर्ण नाव इंडिया जीन ऱ्होड्स आहे. भारत दौरे आणि आयपीएलदरम्यान जॉन्टी ऱ्होड्सने भारतात बराच वेळ घालवला. तब्बल ९ वर्षे ऱ्होड्स हा मुंबई इंडियन्स संघाचा फिल्डिंग कोच होता. त्यामुळे मुंबईत आणि एकंदरीत भारतात त्याने आपल्या कुटुंबाबरोबर सर्वाधिक वेळ घालवला. दक्षिण आफ्रिकेत वाढलेल्या जॉंटी ऱ्होड्सला भारताची विविधता, संस्कृती, वारसा, परंपरा आणि सतत सुरू असलेली लगबग विशेष भावली. हॉटेलच्या चौकटीबाहेर पडून भारतातील वेगवेगळी ठिकाणे अनुभवताना त्याला या देशाची ही वेगळीच बाजू जवळून पाहायला मिळाली. यामुळेच त्याने लेकीचे नाव 'इंडिया' असे ठेवले.

लेकीच्या जन्मानंतर मुंबईत असताना ऱ्होड्स कुटुंबाने त्यांच्या मुलीसाठी पूजा केली होती. पारंपरिक धोती परिधान करून ऱ्होड्स आणि मेलानी यांनी सर्व धार्मिक विधी आनंदाने पूर्ण करत ही पूजा पार पाडली होती. ऱ्होड्सची पत्नी मेलानी वेदांत तत्त्वज्ञानाच्या विचारांशी जोडलेली होती आणि भारताविषयी तिच्या मनात आधीपासूनच एक आध्यात्मिक ओढ होती. भारत भेटीदरम्यान तिच्या या आध्यात्मिक नात्याला आणखी बळ मिळाले आणि त्यामुळे ऱ्होड्स कुटुंबाचे भारताशी असलेले नाते अधिक घट्ट झाले. मुलीचे 'इंडिया' नाव ठेवण्याचे कारण सांगताना ऱ्होड्स म्हणाला होता, की माझ्या मुलीला भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही देशांतील सर्वोत्तम गोष्टी अनुभवता याव्यात आणि तिच्या आयुष्यातही तसाच समतोल राहावा, अशी माझी इच्छा होती.

# क्रिमिनल लॉयर बनली ऑफिसर; २६ व्या वर्षी केली यूपीएससी क्रॅक


## कुटुंबात सर्वच आयएएस-आयपीएस-आयआरएस

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फरहा हुसैन यांनी चिकाटी, मेहनत आणि कुटुंबाच्या सहकार्याने कोणत्याही कोचिंगशिवाय यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केल्याची प्रेरणादायी घटना समोर आली आहे. फरहा यांनी वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी यूपीएससी परीक्षा क्रॅक करीत अधिकारी होण्याचा मान मिळविला. त्यांच्या कुटुंबात आयएएस, आयपीएस आणि आरएएस अधिकाऱ्यांची मोठी परंपरा आहे. आपल्या कुटुंबातील या सेवेचा वारसा पाहून प्रेरित झालेल्या फरहा यांनी यूपीएससी परीक्षा दिली आणि त्यात यश मिळवून आयआरएस अधिकारी झाल्या.

फरहा हुसैन मूळच्या राजस्थानमधील झुंझुनू येथील रहिवासी आहेत. यूपीएससी



### कुटुंबात सर्वच अधिकारी

फरहा हुसैन यांच्या कुटुंबातील ३ सदस्य आयएएस अधिकारी, १ आयपीएस अधिकारी आणि ५ आरएएस अधिकारी आहेत. त्यांचे वडील अशफाक हुसैन हे राजस्थानमध्ये जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. ते आधी आरएएस अधिकारी होते, नंतर त्यांना पदोन्नती मिळून ते आयएएस बनले. फरहा यांचे काका लियाकत खान हे आयपीएस अधिकारी होते आणि झाकीर खान हे आयएएस अधिकारी आहेत. दोन चुलतभाऊ आरएएस अधिकारी असून कुटुंबातील इतर अनेक सदस्य भारतीय सैन्यात उच्च पदांवर कार्यरत आहेत. इतकेच नव्हे; तर फरहा यांचे पती कमर उल जमां चौधरी हेदेखील राजस्थान कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत.

### २३७ रँक

फरहा हुसैन यांना लहानपणापासूनच वकील किंवा अधिकारी बनायचे नव्हते. अनेक मीडिया रिपोर्टनुसार त्यांची आवड एमबीबीएस करून डॉक्टर बनण्यात आणि सौंदर्य स्पर्धांमध्ये सहभागी होण्यात होती. परंतु त्यांच्या कुटुंबाने त्यांना देशसेवेत जाण्यासाठी प्रोत्साहित केले. फरहा यांनी २०१६ मध्ये यूपीएससीची परीक्षा दिली आणि कोणत्याही कोचिंगशिवाय, केवळ स्वतःची मेहनत व चिकाटीच्या बळावर पहिल्याच प्रयत्नात ही परीक्षा उत्तीर्ण करत देशात २३७ वा रँक मिळविला.


# शाळा-ऑफिसात डब्यात नेलेल्या चपात्या वातड होतात?

## एक सोपी ट्रिक चपाती राहील मऊसूत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरी आपण जेव्हा चपात्या करतो तेव्हा त्या तव्यावरून उतरवताना मऊ आणि गरम असतात पण काही वेळानंतर लगेच चपात्या कडक होऊ लागतात. खासकरून सकाळी केलेल्या चपात्या लगेच वातड होतात. दुपारच्या जेवणासाठी टिफिनमध्ये दिलेल्या चपात्या दुपारपर्यंत कधीच मऊ राहत नाही अशी बऱ्याच जणांची तक्रार असते. केल्यानंतर काही वेळातच वातड होतात. चपात्या मऊ राहण्यासाठी केल्यानंतर लगेच डब्यात ठेवणंही योग्य पद्धत नाही.

गरम चपात्यांमधून वाफ निघत असते तर तुम्ही लगेच चपाती डब्यात ठेवून झाकण बंद केले तर त्यातून वाफ निघते आणि चपात्या ओल्या होतात. यामुळे चपातीची चवही बदलते. कधी चपाती चिकट होते तर कधी रबरासारखी लवचिक होते.



### गरम चपाती डब्यात लगेच ठेवून झाकणे ही चूक करू नका

तव्यावरून उतरवल्यानंतर लगेच चपाती डब्यात ठेवून त्यावर झाकण ठेवण्याची चूक करू नका. ३० ते ६० सेकंदांसाठी चपाती कोणत्याही प्लेटमध्ये किंवा स्वच्छ सुती कापडावर ठेवा. त्यातून वाफ पूर्ण निघून गेल्यानंतर डब्यात ठेवा. चपात्या पूर्णपणे थंड करू नका. फक्त अतिरिक्त वाफ निघून जाईल याची काळजी घ्या.

### चपाती व्यवस्थित फुगली तरच मऊ राहील

तुम्ही चपाती कशी ठेवता याप्रमाणेच चपातीचे शेकणेही महत्त्वाचे असते. जेव्हा चपाती तव्यावर व्यवस्थित फुगते तेव्हाच ती मऊ राहते. जर तुम्ही चपाती जास्त शेकली तर ती काही वेळाने वातड होईलच म्हणूनच चपाती तव्यावर जास्त वेळ राहू देऊ नका.

### चपाती कापडात गुंडाळून ठेवा

चपाती थेट डब्यात ठेवण्याऐवजी आधी कापडात गुंडाळून नंतर डब्यात ठेवा. ज्यामुळे कापड अतिरिक्त मॉईश्चर शोषून घेण्यास मदत करेल. जर तुम्ही लंच बॉक्समध्ये चपाती घेऊन जाणार असाल तर खाली स्वच्छ कापड पसरवून ठेवू शकता. फॉईल पेपर वापरण्याऐवजी स्वच्छ कापड पसरवणे चांगला पर्याय आहे. चपाती केल्यानंतर त्यातील स्टार्च हळूहळू संरचना बदलते. म्हणून चपात्यांचे टेक्स्टरही बदलते. चपात्या मऊ ठेवण्यासाठी वर नमूद केलेल्या सोप्या टिप्स वापरल्या तर त्या जास्त वेळ खाण्यायोग्य आणि लुसलुशीत राहतील.

# सांधेदुखीवर सोन्याचा उपाय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माणसाच्या शरीराची हालचाल होण्यासाठी सर्वांत महत्त्वाची भूमिका असते, ती हाडातील सांध्यांची. मग ती हाताची, बोटांची, पायांची, गुडघ्यांची, कोणतीही असेल. वयोमानाप्रमाणे सांध्याच्या हाडांची झीज होते, ती गुडघ्यातील सांध्याच्या हाडांची. गुडघ्याच्या दोन हाडांमध्ये असलेल्या मऊ ऊतींची झीज झाल्यामुळे, हाडे हळूहळू एकमेकांवर घासली जातात. त्यामुळे सांध्याच्या सभोवताली असलेल्या मांसल पेशींना सूज येते. चालताना असह्य वेदना होतात. याला सांधेदुखी किंवा संधिवात म्हणतात.

यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करताना शास्त्रज्ञांनी औषधांमध्ये सोन्याचा उपयोग करण्याचा प्रयोग केला. एकोणिसाव्या शतकात जर्मन जीवाणूतज्ज्ञ (बॅक्टेरियोलॉजिस्ट) रॉबर्ट कॉक याने सोन्याचा अंश असलेले औषध, क्षयरोग म्हणजे टीबी निर्माण करणाऱ्या जीवाणूंसाठी घातक असते, असा शोध लावला. पुढे १९१९ मध्ये फ्रेंच डॉक्टर फॉरेस्टियर यांनी सांधेदुखीवरच्या औषधांमध्ये गोल्ड सॉल्ट्स म्हणजे सोन्याच्या क्षारांचा वापर करण्यास सुरूवात केली. हे क्षार स्नायूंमध्ये टोचल्यामुळे सांधेदुखी कमी होते, असे आढळून आले. १९३२ मध्ये त्यांनी याबाबतचा अधिकृत अहवाल 'द लँसेट' या वैद्यकीय मासिकात प्रकाशित केला. सोन्याचे इंजेक्शन, हे संधिवातविरोधी औषध म्हणून काम करते आणि शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीची क्रिया कमी करून सांधे खराब होण्याचा धोका टाळायला मदत करते, असे नमूद केले.



मुख्यतः सांधेदुखी नियंत्रणात न आल्यामुळे म्हणजे जेव्हा वेदनाशामक औषधांचा परिणाम होत नाही आणि सांधे सुजून निकामी व्हायला लागतात तेव्हा हे औषध दिले जाते. जे सांध्यामधील सूज कमी करून हाडांची झीज रोखायला मदत करते. यामुळे आजार पूर्णपणे बरा होत नाही, पण त्याची तीव्रता रोखली जाते. हे इंजेक्शन ठराविक कालावधीनंतर डॉक्टरांच्या देखरेखीखाली तयार करून स्नायूमध्ये दिले जाते.

गुडघेदुखी ही ऑस्टिओआर्थरायटीस म्हणजे वाढत्या वयामुळे हाडांची झीज आणि रूमेटाइडआर्थरायटीस म्हणजेच रोगप्रतिकारक शक्तीच सांध्यावर घाला घालते; अशा दोन प्रकारांत मोडते. यावरील उपचारसुद्धा क्रायसो थेरेपी म्हणजे सोन्याची इंजेक्शन्स किंवा अर्थोपेडिक सर्जरी किंवा औषधांमध्ये सुईचा वापर न करता देण्यात येणारे इंजेक्शन या दोन प्रकारांत मोडतात. पर्यायी औषध म्हणजे इंजेक्शनऐवजी 'ऑरेनोफिन' नावाचे सोन्याचे औषध गोळ्यांच्या स्वरूपातही उपलब्ध आहे. लहान मुलांना सुईची भीती वाटते, वेदना होतात, संसर्गाचा धोका असतो. त्यामुळे एका विशिष्ट उपकरणाच्या सहाय्याने हे औषध दिले जाते. सुईऐवजी उच्चदाबाच्या पेनसदृश जेटद्वारे, औषध त्वचेखाली सोडले जाते. सांध्याच्या दुखण्यांवर सोन्याच्या इंजेक्शनचा प्रभावी उपाय होतो. परंतु डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आणि मार्गदर्शनाखालीच ती घ्यावीत, हे निश्चित!

# नेत्रदानाबाबतचे हे गैरसमज तुम्हालाही आहेत का? जाणून घ्या सत्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू हा कुटुंबासाठी अत्यंत दुःखाचा क्षण असतो. मात्र, याच क्षणी घेतलेला एक निर्णय दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात शब्दशः प्रकाश आणू शकतो. नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर डोळ्यांतील कॉर्निया दान करणे. डोळ्याचा हा पारदर्शक भाग खराब झाल्याने अनेक लोकांना दृष्टी गमवावी लागते. अशा रुग्णांवर कॉर्निया प्रत्यारोपण करून त्यांची दृष्टी पुन्हा मिळवून देण्याची शक्यता असते.

भारतात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर अशा कॉर्नियाची गरज असते, पण तुलनेत त्याची उपलब्धता कमी असल्याने अनेक रुग्ण प्रतीक्षा यादीतच राहतात.

नेत्रदानाबद्दल समाजात अनेक गैरसमज आजही कायम आहेत. वय वाढले असेल, चष्मा लागत असेल, मधुमेह असेल किंवा मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झाली असेल तर नेत्रदान करता येत नाही, असा समज अनेकांचा असतो. प्रत्यक्षात मात्र अशा अनेक व्यक्ती नेत्रदान करू शकतात. मृत्यूनंतर काही तासांच्या आत कॉर्निया संकलित करता येतो आणि या प्रक्रियेमुळे अंत्यसंस्कारांनाही विलंब होत नाही. राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्याच्या निमित्ताने नेत्रदानाशी संबंधित तथ्य, त्यातील आव्हाने आणि त्यातून हजारो लोकांच्या आयुष्यात घडणारा सकारात्मक बदल समजून घेणे आवश्यक ठरते.

नेत्रदानाबाबत जागरूकता वाढत असली तरी भारतात दरवर्षी आवश्यक असलेल्या कॉर्नियांच्या तुलनेत उपलब्धता खूपच कमी आहे. तज्ज्ञांच्या मते कॉर्नियाशी संबंधित अंधत्व असलेल्या लाखो रुग्णांना प्रत्यारोपणाची गरज आहे; मात्र पुरेशा प्रमाणात नेत्रदान होत नसल्याने अनेकांना वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते. यामागे केवळ दात्यांची कमतरता हे कारण नाही, तर नेत्रदानाविषयी असलेले गैरसमज, मृत्यूनंतर त्वरीत निर्णय घेण्यातील अडचणी, ग्रामीण भागातील मर्यादित सुविधा आणि जनजागृतीचा अभाव हीदेखील महत्त्वाची कारणे आहेत. अनेकदा नेत्रदान म्हणजे संपूर्ण डोळा काढला जातो किंवा त्यामुळे मृत व्यक्तीचा चेहरा विद्रूप होतो, असा समज असतो. प्रत्यक्षात प्रशिक्षित तज्ज्ञ अतिशय काळजीपूर्वक कॉर्निया संकलित करतात आणि त्यामुळे चेहऱ्याच्या स्वरूपावर परिणाम होत नाही. याशिवाय चष्मा वापरणारे, मधुमेह असलेले किंवा मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेल्या अनेक व्यक्तीदेखील नेत्रदान करू शकतात. राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यासारखे उपक्रम हे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करतात.



### १) नेत्रदानामध्ये नेमके काय दान केले जाते?

नेत्रदानामध्ये प्रत्यारोपणासाठी कॉर्निया हा सर्वांत महत्त्वाचा भाग असतो. कॉर्निया हा डोळ्याच्या पुढील बाजूचा पारदर्शक भाग असतो. प्रकाश केंद्रित करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते. संकलनानंतर नेत्रपेढीमध्ये या त्याची काळजीपूर्वक तपासणी करून ते सुरक्षितपणे जतन केले जातात. कॉर्निया प्रत्यारोपणासाठी योग्य आहे हे निश्चित झाल्यावर त्याचे खराब किंवा आजारी कॉर्नियामुळे दृष्टीबाधित झालेल्या रुग्णावर प्रत्यारोपण केले जाते. नेत्रदान करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या कुटुंबीयांनी तातडीने जवळच्या नेत्रपेढीशी संपर्क साधून संबंधित व्यक्तीची नेत्रदानाची इच्छा होती, याची माहिती द्यावी. त्यानंतर संकलन पथक वैद्यकीय इतिहास घेते, दान करण्यास ती व्यक्ती योग्य आहे का हे पाहून मग कॉर्निया टिश्यू संकलित करते.

### २) मृत्यूनंतर किती वेळात नेत्रदान करावे?

मृत्यूनंतर शक्य तितक्या लवकर नेत्रपेढीशी संपर्क साधावा. कॉर्नियाच्या संकलनाबद्दल डॉ. रश्मी बर्वे यांनी माहिती दिली. त्या ठाण्याच्या किम्स हॉस्पिटल येथे नेत्ररोगशास्त्र विभागात कन्सल्टंट म्हणून कार्यरत आहेत. त्या सांगतात, " कॉर्निया सामान्यतः ६ ते ८ तासांच्या आत संकलित केला जातो. संकलन पथक येईपर्यंत डोळे अलगद बंद ठेवणे, त्यावर स्वच्छ ओलसर कापूस किंवा गॉज ठेवणे आणि डोके थोडे उंच ठेवणे उपयुक्त ठरते."

### ३) नेत्रदान करू शकते? त्याला वयाची काही मर्यादा आहे का?

नेत्रदानासाठी वयाची निश्चित मर्यादा नाही. वृद्ध व्यक्तीही संभाव्य नेत्रदाता असू शकतात, कारण मृत्यूनंतर कॉर्नियाच्या ऊतींची (टिश्यू) उपयुक्तता तपासली जाते. काही विशिष्ट वैद्यकीय स्थिती किंवा संसर्गामुळे नेत्रदानासाठी व्यक्ती अपात्र ठरू शकते. नेत्रदात्याच्या वैद्यकीय इतिहासाचा आढावा आणि संकलित ऊतींची तपासणी केल्यानंतर नेत्रपेढी अंतिम निर्णय घेते.

### ४) नेत्रसंकलनास किती वेळ लागतो?

नेत्रसंकलनाच्या प्रक्रियेबद्दल अनेक गैरसमज असतात तसेच भीतीही असते. नेत्रसंकलन ही तुलनेने कमी वेळात पूर्ण होणारी प्रक्रिया आहे आणि सामान्यतः त्यामुळे अंत्यसंस्काराला मोठा विलंब होत नाही. प्रशिक्षित पथकाकडून ही प्रक्रिया अत्यंत आदरपूर्वक केली जाते. तेथील परिस्थितीनुसार ती रुग्णालयात किंवा दात्याच्या घरी केली जाऊ शकते. संकलनानंतर कुटुंबीय अंत्यसंस्काराची प्रक्रिया पुढे सुरू करू शकतात. म्हणूनच नेत्रदानामुळे अंत्यसंस्काराच्या विधींवर परिणाम होतो, हा गैरसमज कुटुंबीयांनी बाळगू नये.

### ५) चष्मा वापरणारे, मधुमेह असलेले किंवा मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले लोक नेत्रदान करू शकतात का?

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते अनेक प्रकरणांमध्ये असे लोक नेत्रदान करू शकतात. चष्मा वापरणे म्हणजे नेत्रदानासाठी तत्काळ अपात्र असे ठरत नसते. तसेच मधुमेह किंवा मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झाली असेल तर ती व्यक्ती आपोआप अपात्र असे ठरत नसते. संबंधित नेत्रपेढीच त्या व्यक्तीचा वैद्यकीय इतिहास आणि कॉर्नियाची स्थिती तपासून प्रत्यारोपणासाठी त्याचा वापर करता येईल की नाही, हे ठरवते. त्यामुळे एखादी व्यक्ती नेत्रदानासाठी अपात्र आहे, असे कुटुंबीयांनी स्वतःहून गृहीत धरू नये.

कमी किंवा जास्त नंबरचा चष्मा लागणे, मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा पूर्वी डोळ्यांवर शस्त्रक्रिया झालेली असणे यामुळे नेत्रदान करता येत नाही, असा समज चुकीचा आहे.




# पिठोरी अमावास्या केव्हा आहे?

## पाहा शुभ मुहूर्त आणि पितरांसाठी ही अमावास्या महत्त्वाची का असते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिन्यातील अमावास्येला पिठोरी अमावास्या म्हणतात. या दिवशी पवित्र नदीच्या पाण्यात स्नान करणे अतिशय महत्त्वाचे मानले आहे. तसेच या अमावास्येला पिंपळाच्या झाडाच्या पूजेचा नियम देखील आहे. पिठोरी अमावास्येला कुशाग्रहानी अमावास्या असेही म्हणतात. असे मानले जाते, की या दिवशी शुभकार्ये केल्याने शुभ परिणाम मिळतात. तसेच पूर्वजांचे आशीर्वाद जीवनात आनंद, समृद्धी आणि सुख शांती निर्माण करतात. त्यामुळे आपण पिठोरी अमावास्येची तारीख, शुभ मुहूर्त आणि पितरांच्या दृष्टीने त्याचे महत्त्व सविस्तर जाणून घेऊया.

### पिठोरी अमावास्या कधी आहे?

पंचांगानुसार श्रावण महिन्याची अमावास्या तिथी गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी १०:३४ वाजता सुरू होईल. तसेच अमावास्येची तिथी ही दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी ८:५७ पर्यंत असेल.



धर्मग्रंथांमध्ये दुपारी पितृकर्म करण्याचा नियम सांगण्यात आला आहे. त्यामुळे पितृपक्ष, तर्पण, श्राद्ध इत्यादी विधी दि. १० सप्टेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे अमावास्या तिथी ही दि. ११ सप्टेंबरला येत असल्याने या दिवशी स्नान करणे आणि अमावास्येचे दान करणे यासारखे शुभ कार्य शास्त्रानुसार स्वीकारार्ह असेल.

### पिठोरी अमावास्या व पितरांचे पूजन महत्त्व

श्रावण अमावास्या म्हणजेच पिठोरी अमावास्येला पितरांचे श्राद्ध, पूजन तर्पण केले जाते. पितरांसाठी जेवण बनवून त्यांना बोलावले जाते. यामुळे पितरांचे आशीर्वाद कायम कुटुंबावर राहतात व घरात सुख-समृद्धी नांदते, असे मानले जाते. हा दिवस पितृपूजनासाठी खास असल्याने या दिवशी त्यांचे पूजन केल्याने शुभफळ मिळते, अशी मान्यता आहे. तसेच कोणाला जर पितृदोष असेल तर त्यांनी आवर्जून या दिवशी आपल्या पितरांसाठी विधी करावेत आणि त्यांची क्षमा मागून सुख-समृद्ध आयुष्यासाठी प्रार्थना करावी.

**पिठोरी अमावास्या २०२६ शुभ मुहूर्त**
**सूर्योदय वेळ :** सकाळी ६ वाजून ०४ मिनिटे
**शुभ मुहूर्त :** सकाळी ७ वाजून ३७ मिनिटे ते सकाळी ८ वाजून ५७ मिनिटे



# जीवनसाथी निवडण्यापूर्वी चाणक्यांनी सांगितलेले ४ आवश्यक नियम नक्की जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विवाह हा आयुष्यातील एक महत्त्वाचा निर्णय आहे. केवळ एखाद्या व्यक्तीच्या आकर्षकतेवर किंवा तुमच्या स्वतःच्या भावनांवर आधारित जीवनसाथी निवडणे योग्य नाही. आपल्या नीतीमध्ये, आचार्य चाणक्यांनी नातेसंबंध निश्चित करण्यापूर्वी विचारात घ्यावयाचे गुण, दोष आणि वर्तन सांगितले आहे. त्यांचा विश्वास होता की एक मजबूत नातेसंबंध विश्वास, आदर आणि चांगल्या चारित्र्यावर बांधला जातो. चाणक्य नीतीमध्ये काही तत्त्वे सांगितली आहे, जी योग्य जीवनसाथी निवडण्यात उपयुक्त ठरू शकतात. त्यांच्याबद्दल येथे जाणून घ्या.

### नात्याचा एक मजबूत पाया

विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे मिलन नाही, तर जबाबदारी, विश्वास आणि परस्पर आदराचे नाते आहे. त्यामुळे जीवनसाथी निवडताना घाईने किंवा भावनिक होऊन घेतलेला निर्णय नंतर समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. चाणक्य नीतीनुसार एखाद्या व्यक्तीची खरी ओळख केवळ त्याच्या रूपावरून किंवा आर्थिक स्थितीवरून ठरत नाही, तर त्याच्या चारित्र्य, वर्तन आणि मूल्यांवरून ठरते.

### रूपाकडे नव्हे, तर चारित्र्याकडे पाहा

चाणक्याच्या मते केवळ बाह्य सौंदर्याच्या आधारावर लग्न करू नये. आकर्षणाचा प्रभाव तात्पुरता असू शकतो, परंतु दीर्घकाळ एक मजबूत नातेसंबंध टिकविण्यासाठी चांगला स्वभाव, समजूतदारपणा आणि आदर महत्त्वाची भूमिका बजावतात.

### रागीट स्वभावापासून सावध

चाणक्य नीती अशा व्यक्तीपासून सावध राहण्याचा सल्ला देते, जी क्षुल्लक गोष्टींवरून रागावते किंवा सतत कठोर भाषा वापरते. असे मानले जाते की अशा वर्तनामुळे नातेसंबंधात तणाव आणि संघर्ष वाढू शकतो.

### लोभापासून दूर राहा

जर एखादी व्यक्ती नात्यापेक्षा संपत्ती किंवा आर्थिक फायद्याला प्राधान्य देत असेल, तर अशी नाती जास्त काळ टिकत नाहीत. आयुष्यात परिस्थिती बदलते आणि कठीण काळात, केवळ तोच जोडीदार पाठीशी उभा राहतो जो नात्याला प्राधान्य देतो.

### चारित्र्याला सर्वोच्च महत्त्व

प्रामाणिकपणा, चांगली मूल्ये आणि उत्तम आचरण ही कोणत्याही व्यक्तीची सर्वात मोठी ओळख असते. खोटे बोलणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या किंवा गैरकृत्ये करणाऱ्या व्यक्तीसोबत विश्वासाचे नाते निर्माण करणे कठीण असते. त्यामुळे, लग्नाआधी एखाद्या व्यक्तीचे चारित्र्य, विचार आणि वागणूक पूर्णपणे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

# आज बुधपूजन : महत्त्व, शुभ मुहूर्त आणि पूजा विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतीय संस्कृतीत ग्रहांच्या पूजेला आणि त्यांच्या उपासनेला विशेष स्थान आहे. ज्योतिषशास्त्रानुसार दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी बुध ग्रहाने सिंह राशीतून स्वतःच्या कन्या राशीत (उच्च स्थान) प्रवेश केला आहे. बुध ग्रह कन्या राशीत आल्यामुळे 'भद्रा राजयोग' निर्माण झाला आहे. अशा अत्यंत शुभ योगाच्या पार्श्वभूमीवर बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी येणारे बुधपूजन भाविकांसाठी आणि विशेषतः व्यापारी व विद्यार्थ्यांसाठी विशेष फलदायी ठरणार आहे.

### ९ सप्टेंबर २०२६ चे पंचांग आणि शुभ मुहूर्तवार :

**बुधवार तिथी :** भाद्रपद कृष्ण त्रयोदशी (दुपारी १२:३१ पर्यंत).

**चतुर्दशी नक्षत्र :** आश्लेषा (दुपारी ०३:१३ पर्यंत).

**मघा अभिजित मुहूर्त (सर्वात शुभ वेळ) :** सकाळी ११:५३ ते दुपारी १२:४३.

**अमृत चौघडिया :** सकाळी ०७:३६ ते ०९:१०.

**राश्यांतर प्रभाव :** बुध स्वतःच्या कन्या राशीत असल्यामुळे या दिवशी पूजा केल्याने बुधाचा शुभ प्रभाव अनेक पटींनी वाढेल.

(टीप : राहू काळ दुपारी १२:१८ ते ०१:५२ या वेळेत नवीन कामे करणे टाळावे.)

### बुधपूजनाचे धार्मिक व ज्योतिषशास्त्रीय महत्त्व

**१) बुद्धी आणि विद्येची प्राप्ती :** ज्या विद्यार्थ्यांना अभ्यासात लक्ष केंद्रित करायचे आहे किंवा यश मिळवायचे आहे, त्यांच्यासाठी हा दिवस उत्तम आहे. बुध देव बुद्धीचे दाते मानले जातात.

**२) व्यापारात प्रगती :** व्यापारी वर्गासाठी बुध पूजन अतिशय लाभदायक मानले जाते. यामुळे व्यवसायातील अडथळे दूर होऊन धनलाभाचे योग येतात.

**३) वाणीत गोडवा व संवाद कौशल्य :** बुध ग्रहाच्या कृपेने व्यक्तीचे संवाद कौशल्य सुधारते.

**४) कुंडलीतील बुध दोष निवारण :** ज्यांच्या कुंडलीत बुध ग्रह कमकुवत आहे किंवा अशुभ फल देत आहे, त्यांनी या दिवशी व्रत आणि पूजा केल्यास बुधाचे दोष शांत होतात.

### बुधपूजन कसे करावे? (सोपी पूजा विधी)

बुधवारी सकाळी लवकर उठून स्नान करावे आणि हिरवे वस्त्र परिधान करावे (बुध ग्रहाचा प्रिय रंग हिरवा आहे).

**पूजा स्थान स्वच्छ करा :** घरातील देवघर किंवा पूजेची जागा स्वच्छ करून तिथे दिवा लावावा.

**बुध देवाचे ध्यान :** एका पाटावर हिरवे कापड पसरवून त्यावर बुध यंत्र किंवा बुध देवाचे चित्र/मूर्ती स्थापित करावी. (मूर्ती नसल्यास महाविष्णू किंवा गणपती बाप्पांची पूजा करावी. कारण बुध देव हे भगवान विष्णू आणि श्रीगणेशांचे उपासक मानले जातात).

**अभिषेक व नैवेद्य :** बुध देवाला किंवा गणपती बाप्पांना दुर्वा, हिरवे मूग आणि पिवळी किंवा हिरवी फुले अर्पण करावीत. नैवेद्यासाठी गूळ-खोबरे किंवा मोदक अर्पण करावेत.

**मंत्र पठण :** पूजेदरम्यान 'ॐ बुं बुधाय नमः' या मंत्राचा कमीत कमी १०८ वेळा जप करावा.

**आरती आणि दान :** पूजेच्या शेवटी आरती करावी आणि प्रसाद वाटावा. या दिवशी गरिबांना हिरवे मूग किंवा हिरवे कपडे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते.

### या राशींना होणार विशेष फायदा

बुधाच्या या कन्या राशीतील गोचरामुळे आणि बुधपूजनाच्या शुभ प्रभावामुळे मिथुन, सिंह, कन्या, तूळ, धनू, कुंभ आणि मीन या राशींच्या व्यक्तींना नोकरी, व्यवसाय आणि आर्थिक बाबतीत प्रचंड यश मिळण्याची शक्यता आहे.

# राशीनुसार 'झोप' आणि 'सकाळची उठण्याची' स्टाईल कशी आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सकाळची झोप मोडायला कोणाला आवडते? पण झोपण्याच्या आणि सकाळी उठण्याच्या बाबतीत प्रत्येकाची स्टाईल एकदम वेगळी असते. कोणी अलार्म वाजण्यापूर्वीच उठते, तर कोणाला उठवण्यासाठी घरातल्यांना युद्ध करावे लागते. चला पाहूया राशीनुसार तुमची 'स्लीपिंग स्टाईल' कशी आहे.




**१) मेष – 'स्प्रिंगसारखे उठणारे':** यांच्यात प्रचंड एनर्जी असते. यांचा अलार्म वाजला रे वाजला, की हे स्प्रिंगसारखे थेट बेडवरून खाली उडी मारतात. यांना अंथरुणात लोळत पडायला अजिबात आवडत नाही. हे ठरवलेल्या वेळेत लगेच तयार होतात.

**२) वृषभ – 'कुंभकर्णाचे वंशज':** यांचे झोपेवर जिवापाड प्रेम असते! सुट्टीच्या दिवशी यांना झोपेतून उठवणे म्हणजे सिंहाच्या जबड्यात हात घालण्यासारखे आहे. हे ५-५ अलार्म लावतात, पण ते सगळे बंद करून पुन्हा आरामात झोपी जातात.

**३) मिथुन – 'मोबाईल प्रेमी' :** यांचे डोळे उघडले की यांचा हात थेट मोबाईलकडे जातो. झोपण्यापूर्वी अर्धा तास रिल्स बघणे आणि सकाळी उठल्याबरोबर व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्राम चेक केल्याशिवाय यांची सकाळच होत नाही.

**४) कर्क – 'गोदडी/ब्लँकेट प्रेमी' :** यांना झोपण्यासाठी त्यांचे आवडते ब्लँकेट, उशी किंवा एखादी विशिष्ट जागा लागतेच. हे कुशीत शिरून, एकदम गोल होऊन झोपतात. यांची झोपमोड केली, तर हे दिवसभर खूप चिडचिड करतात.

**५) सिंह – 'राजासारखे पसरणारे' :** बेड कितीही मोठा असू दे, तो यांना एकट्यालाच लागतो. हे एकदम राजासारखे हातपाय पसरून झोपतात. यांच्या बाजूला झोपणाऱ्या व्यक्तीला कायम बेडच्या कडेलाच झोपावे लागते किंवा खाली पडण्याची भीती असते.

**६) कन्या – 'वेळेचे पक्के आणि ओव्हरथिंकर्स' :** हे रात्री झोपताना उद्याचे पूर्ण प्लॅनिंग करून झोपतात. कधीकधी विचारांच्या गर्दीमुळे यांना लवकर झोपच लागत नाही. पण यांची खासियत म्हणजे, यांना अलार्मची गरज नसते, यांची 'बॉडी क्लॉक' एकदम अचूक असते.

**७) तूळ – 'फक्त ५ मिनिटे वाले' :** यांना झोपेतून उठायला खूप त्रास होतो. अलार्म वाजल्यावर "आई, फक्त ५ मिनिटे हा..." हे यांचे ठरलेले वाक्य असते. आणि ती ५ मिनिटे कधी अर्ध्या तासात बदलतात, हे यांना स्वतःलाही कळत नाही.

**८) वृश्चिक – 'रात्रीचे घुबड' :** यांचा खरा दिवस रात्री सुरू होतो. रात्री उशिरापर्यंत जागत बसणे, चित्रपट बघणे किंवा काम करणे यांना आवडते. त्यामुळे साहजिकच, सकाळी लवकर उठणे यांच्यासाठी एखाद्या मोठ्या शिक्षेसारखे असते.

**९) धनू – 'बेडवरची जिम्नॅस्टिक्स' :** हे झोपताना एकसारखे कधीच राहत नाहीत. रात्री डोके उशीवर असते आणि सकाळी पाहिल्यास तिथे यांचे पाय असतात. हे झोपेत इतके फिरतात की यांच्या शेजारी झोपायला लोक घाबरतात.

**१०) मकर – 'झोपेचे कॅल्क्युलेशन करणारे' :** हे अत्यंत प्रॅक्टिकल असतात. "जर मी आता झोपलो, तर मला बरोबर ६ तास आणि १५ मिनिटांची झोप मिळेल" असे हिशोब हे रात्री झोपताना करतात. हे उठल्याबरोबर कामाला लागतात, यांचा एकही मिनिट वाया जात नाही.

**११) कुंभ – 'अनपेक्षित झोप' :** यांचा झोपण्याचा आणि उठण्याचा काहीही नियम नसतो. कधी हे सलग १२ तास झोपतील, तर कधी फक्त २-३ तासांच्या झोपेवर फ्रेश राहतील. हे झोपेत भन्नाट आणि एकदम साय-फाय स्वप्ने पाहतात.

**१२) मीन – 'स्वप्नांच्या दुनियेत रमणारे' :** यांना झोपायला खूप आवडते कारण झोपेत हे स्वतःच्या वेगळ्याच आणि सुंदर दुनियेत असतात. यांना उठवताना खूप प्रेमाने उठवावे लागते. अचानक उठवले, तर हे एकदम घाबरतात आणि गोंधळून जातात.

# देवपूजा करताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू का येतात?

## अचानक जांभई का येते? कमी लोकांना माहिती आहे धार्मिक, शास्त्रीय कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात देवाची पूजा करण्याला विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. पूजा ही केवळ देवासमोर दिवा लावणे, फुले अर्पण करणे किंवा आरती करणे इतकीच मर्यादित नसून, ती मन शुद्ध करण्याची, देवाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि स्वतःमध्ये सकारात्मक विचार निर्माण करण्याची एक साधना मानली जाते. अनेकदा आपण पाहतो, देवाची पूजा करताना कधीकधी डोळ्यात अश्रू येतात किंवा अचानक जांभई येते, याबाबत धार्मिक आणि शास्त्रीय अशा दोन्ही बाजूंनी वेगवेगळे अर्थ सांगितले जातात. जाणून घेऊ.

### पूजा करताना अश्रू येण्याची धार्मिक कारणे

**भक्तिभाव जागृत होणे :** देवाचे नामस्मरण करताना मन भावूक होऊन डोळ्यांत अश्रू येतात. याला भक्तीची तीव्र भावना मानली जाते.

**देवाशी भावनिक नाते :** पूजा करताना मन एकाग्र झाल्यामुळे देवाप्रती प्रेम, श्रद्धा आणि समर्पणाची भावना वाढते. त्यातून अश्रू येऊ शकतात.

**मनातील भावना बाहेर पडणे :** धार्मिक मान्यतेनुसार, देवासमोर मन मोकळे केल्याने दुःख, चिंता किंवा मनातील दडलेल्या भावना अश्रूंच्या माध्यमातून व्यक्त होतात.

**समर्पणाची भावना :** काही भक्तीपरंपरांमध्ये देवासमोर अश्रू येणे हे अहंकार कमी होऊन परमेश्वराप्रती पूर्ण समर्पणाची भावना निर्माण झाल्याचे प्रतीक मानले जाते.

**आध्यात्मिक अनुभव :** काही लोकमान्यतेनुसार, पूजा किंवा मंत्रजप करताना विनाकारण अश्रू येणे हे मनावर भक्तीचा खोल परिणाम झाल्याचे लक्षण मानले जाते.

### पूजा करताना जांभई येण्याची धार्मिक कारणं

**नकारात्मकता दूर होणे :** काही धार्मिक मान्यतेनुसार, पूजा किंवा मंत्रजप करताना जांभई येणे म्हणजे शरीर-मनातील नकारात्मकता कमी होत असल्याचे संकेत मानले जातात.

**मनातील अस्वस्थता कमी होणे :** देवाचे स्मरण केल्याने मन शांत होत असल्यामुळे जांभई येणे हे मानसिक ताण हलका होण्याशी जोडले जाते.

**ऊर्जेतील बदल :** काही आध्यात्मिक परंपरांमध्ये मंत्रजप आणि प्रार्थनेदरम्यान शरीरातील ऊर्जेत बदल होत असल्यामुळे जांभई येऊ शकते, अशी धारणा आहे.



**एकाग्रतेशी संबंधित मान्यता :** पूजा करताना मन बाह्य गोष्टींपासून दूर होऊन देवाकडे केंद्रित होत असताना शरीर रिलॅक्स होते. या अवस्थेला काही जण आध्यात्मिक शांतीचे लक्षण मानतात.

**देव नाराज असल्याचा संकेत :** पूजा करताना जांभई आली किंवा अश्रू आले म्हणून पूजा अशुभ झाली किंवा देव नाराज झाले, असे धार्मिकदृष्ट्या निश्चित मानले जात नाही.

पूजा करताना अश्रू आणि जांभई येणे, शास्त्रीय कारण-

पूजा, प्रार्थना किंवा मंत्रजप करताना काही लोकांना अचानक अश्रू येणे किंवा जांभई येणे जाणवते. याचा वैज्ञानिक दृष्टीकोन पाहता शरीर आणि मेंदूमध्ये होणाऱ्या नैसर्गिक प्रक्रियांमुळेही असे होऊ शकते.

**शरीर रिलॅक्स होणे :** पूजा, प्रार्थना किंवा मंत्रजप करताना मन शांत होते. शरीर रिलॅक्स झाल्यामुळे जांभई येऊ शकते.

**झोपेची कमतरता :** रात्री पुरेशी झोप झाली नसेल किंवा सकाळी लवकर पूजा करत असाल, तर शरीराचा थकवा जांभईच्या रूपाने दिसू शकतो.

**एकाच जागी शांत बसणे :** बराच वेळ शांत बसून एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित केल्याने जागरूकतेची पातळी थोडी कमी होऊ शकते आणि जांभई येऊ शकते.

**भावनिक प्रतिक्रिया:** प्रार्थना, भक्तिगीते किंवा देवाचे स्मरण करताना मन भावूक झाल्यास डोळ्यांत अश्रू येऊ शकतात.

**दडलेल्या भावना व्यक्त होणे :** शांत वातावरणात मन स्थिर झाल्यावर काही जुन्या आठवणी किंवा भावना जागृत होऊ शकतात. त्यातून नकळत अश्रू येऊ शकतात.

**अगरबत्ती आणि धूपाचा धूर :** अगरबत्ती, धूप किंवा कापूराच्या धुरामुळे डोळ्यांना चुरचुर होऊन नैसर्गिकरित्या पाणी येऊ शकते.

**डोळ्यांचा कोरडेपणा :** डोळे कोरडे असल्यास किंवा बराच वेळ पापण्यांची हालचाल कमी झाल्यास शरीर डोळ्यांना ओलावा देण्यासाठी अश्रू निर्माण करू शकते.

**ॲलर्जी किंवा संवेदनशीलता :** धूप, अगरबत्ती, फुले किंवा सुगंधी पदार्थांची संवेदनशीलता असल्यास पूजा करताना डोळ्यांत पाणी येऊ शकते.

**मनावरील ताण कमी :** प्रार्थनेमुळे मानसिक ताण कमी झाल्यावर शरीराची नैसर्गिक विश्रांतीची प्रक्रिया सुरू होऊ शकते. त्यावेळी जांभई येणे किंवा भावनिक अश्रू येणे शक्य आहे.

**शुभ-अशुभ संकेत :** वैज्ञानिकदृष्ट्या पूजा करताना अश्रू किंवा जांभई येणे हे देवाचा संकेत, शुभ किंवा अशुभ घटना असल्याचे ठोस पुरावे नाहीत. हे प्रामुख्याने शरीराची नैसर्गिक किंवा भावनिक प्रतिक्रिया असू शकते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)